# ॥ समर्पण ॥

ओढ लागली दत्ताची
वाढे गोडी परमार्थाची
मिळे स्फूर्ती साधनेची
होई पूर्ती आनंदाची ॥ १ ॥

मूर्ती साजिरी मायेची
प्रेमळ सावली वात्सल्याची
उभी पाठीशी कायमची
चिंता वाहे भक्तांची ॥ २ ॥

घ्यावी प्रचीती दत्तांची
चित्तवृत्ती हो पावनतेची
सेवा करिता चरणांची
मिळे अनुभूती चैतन्याची ॥ ३ ॥

दत्तनाम घेता वाची
स्वानुभव अष्टांग रोमांची
राख होतसे दुःखांची
हि किमया दत्तकृपेची ॥ ४ ॥

काय चिंता भविष्याची
भीती कायसी अशाश्वताची
मनी भावना समर्पणाची
फिटेल चिंता निःशंकची ॥ ५ ॥

© www.saarthbodh.com

श्री गुरु चरण रज,
सचिन पु. कुलकर्णी
FB ID - sachin.kulkarni78